श्री

न्यू  इंग्लंडच्या मराठी मंडळाच्या *कमीटी* सभासदांना,

सप्रेम नमस्कार अन् मनःपुर्वक अभिनंदन.

परवांचा गणेशोत्सव अतिषय उत्कृष्टपणे सादरा करण्यांत आला.  त्याबद्दल तुम्हां सर्वांचे खूप कौतूक करावेसे वाटते. गेली अनेक वर्षे *Massachusetts* च्या बाहेर असल्याने, आमचा आणि न्यू इ.म.मंडळाचा सहवास कांहीसा दुरावला होता. आतां परतल्यावर,अंतर लांब असूनही आमच्या तीन पिढयांनीं मंडळाच्या गणेशोत्सवास येण्याचे ठरवीले.  त्याचे  सार्थक झाले.

एवढा मोठा समारंभ आयोजीत करण्यामागें प्रचंड श्रम, कष्ट व स्वयंसेवकांची एकसुत्रता लागते.  ती सातत्याने जाणवत होती. आरतीच्या वेळी एवढा समुदाय जमलेला पाहून खूप गहीवरून आले.  त्यानंतर 'उत्सवदिंडी यात्रा' तर इतकी सुंदर होती कीं त्यांचा *टॅलेंट* पाहून, भारतांतून सुटीवर आलेल्या माझ्या भाउवहिनीने प्रांजळपणे कबुली जबाब दिला कीं, भारतांतही एवढया उत्कृष्ट दर्जाचा कार्यक्रम हौशी कलाकार करूं शकत नाहींत. सूत्रधारांनी सांगीतलेली सणाव्रतांची थोडक्यांत पण शैक्षणीय माहीती अतीषय सुचक होती. त्याबद्दल अदिती टेलरची आई व मावशी यांचेही अभिनंदन.  अदिती टेलरने स्वतःचा व्यवसाय, कौटूंबीक जबाबदारी संभाळून अेवढया कौशल्याने, एकटीने ही धुरा अतीशय देखणी अशी सादर केली–(*apple does not fall far from the tree)-* त्याबद्दल तिचे आणि त्यांत भाग घेणाऱ्या सर्व कलाकारांचे कौतूक करण्यांस माझे शब्द अपुरे पडत आहेत.

प्रोग्रॅम बघतांना आपल्याकडे अेवढा *टॅलेंट* आहे याचे अधिकच कौतूक वाटत होते.  सर्वांत कहर केला तो छोटया छोटया बच्छडयानी !  तालबद्ध सुरांत "शुर आम्ही सरदार " हे गाणे जेव्हां त्यानीं जोषांत म्हटले तेव्हां त्यांची पाठ थोपटाविशी वाटली. हया कौशल्यपूर्वक सादर केलेल्या उत्सवदिंडीत पडद्यामागे व पडद्याबाहेरील सर्व वारकऱ्यांना आमचा परत परत मानाचा मुजरा!

*Now last but not least,*  जेवण वाढायला जेव्हां लेहरीनचे सर्व स्वयंसेवक हंसतमुखाने ऊभे पाहीले तेव्हां जेवणाअगोदरच पोट भरले. नोकरी, व्यवसाय, कौटूंबीक जबाबदारी, लांब अंतरे या सर्वांवर मात करून लोकसेवेच व्रत घेऊन असे श्रम करणे ही खरोखरच तारेवरची कसरत आहे. तेच कलाकार स्टेजवर, त्याच सुगृहीणी स्वयंपाक करायला! आपली देवी अष्टभूजा कशीं आहे याची प्रचीती आली.

ज्यासाठी केला होतां हट्टाहांस.. . सुमारे तीस वर्षांपुर्वी मंडळाचा पहिला गणेशोत्सव मी आणि मधुकरने पुढाकार घेऊन केला होतां, आजच्या मानाने कितीतरी घरगुती व लहान प्रमाणांत.. . त्याचा वेलू गेला गगनावरी ! तुम्हां सर्वांच्या कौतुकाने माझे मन पुन्हां पुन्हा उचंबळून येत आहे. जीते रहो ! अशाच श्रमजीवी स्वयंसेवकांच्या जीवावर मंडळ फोफावतात, आपली म्हराटी संस्कृती वाढीस लागते. अन् त्याची सोनसळ आपल्या पुढच्या पिढीला ताठ मानेने जगायला मजबूत पाया देते.

श्री महाले आणि त्यांच्या *कमीटीचे* त्रिवार आभार आणि न्यू इ.म. मंडळाच्या वाटचालीला सदैव शुभेच्छा!

जातां जातां काही नम्र सुचना.

- आपल्याकडे उत्तम गाणारे कलावंत आहेत. त्यानी *माईकवर* गणेशोत्सवाची आरती खणखणीत म्हणावी. म्हणजे जमलेल्या मंडळीना आरती म्हणण्यांस जोष येईल.
- प्रत्येक कार्यक्रमाच्यावेळीं चहा, कॉफी, त्या साठीं उकळते पाणी, दुध, साखर इ. सतत पुरविल जावे.
- सभागृहांत कार्यक्रम चालूं असतांना पालकानी समंजसपणे आपल्या रडणाऱ्या मुलाना कृपया बाहेर नेऊन, बाकीच्या श्रोतृजनांवर दया करावी.
- एक फार जाणवले ते जुने सभासद, माजी अध्यक्ष, आमच्या पिढीचे उत्साही सभासद या सर्वांची हाताच्या बोटांवर मोजतां येईल अशी अल्प संख्या.

कळावे लोभ असावा.

आपली नम्र,

ज्योति जोशी,

jyotijoshi@comcast.net